जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसुल शाखा)-४११००१
E-mail Id-mahsulpune१@gmail.com Ph. No. ०२०-२६११४८०४

क्र.मुळशी/एनए/एसआर/२८/२०१८
पुणे-१ दिनांक-२८/११/२०१८

प्रति,

**तहसिलदार मुळशी**, ता. मुळशी, जि.पुणे

**विषयः-जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत.**

मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/ स.नं. १३७/१/१ब, १३७/१/२, १३७/२/१ व १३७/२/२ मधील एकुण १३४५०.०० चौ.मी. क्षेत्र **निवासी** प्रयोजनार्थ **अकृषिक झाल्याची** नोंद घेणेबाबत

संदर्भ:- १) अर्जदार **मे. रोहन हौसिंग प्रा.लि. तर्फे श्री. संजय खुशालचंद लुंकड** यांचा दिनांक-०५/१०/२०१८ रोजीचा अर्ज

२) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दि-०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना

३) शासन परिपत्रक क्र.एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक-१९ ऑगस्ट २०१७

४) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयाकडील क्र. बीएमयु/मौजे हिंजवडी/ स.नं./ग.नं. १३७/१/१/ब/प्र.क्र./१७१९/१५-१६, दिनांक-२७/०९/२०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त नमुद विषयान्वये, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे **मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/स.नं. १३७/१/१ब, १३७/१/२, १३७/२/१ व १३७/२/२ मधील एकुण १३४५०.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी** प्रयोजनासाठी जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

२. अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./गट नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| १ | रोहन हौसिंग प्रा.लि. तर्फे संचालक संजय खुशालचंद लुंकड | १३७/१/१ब | ३१००.०० |
| २ | भारत सुवालाल देसडला | १३७/१/२ | २६००.०० |
| ३ | रोहन हौसिंग प्रा.लि. तर्फे संचालक भारत सुवालाल देसडला | १३७/२/१ | ५०५०.०० |
| ४ | रोहन हौसिंग प्रा.लि. तर्फे संचालक संजय खुशालचंद लुंकड | १३७/२/२ | २७००.०० |

| | |
|---|---|
| **एकूण क्षेत्र** | **१३४५०.००** |
| रेखांकन/बाधकाम नकाशामध्ये समाविष्ठ केलेले क्षेत्र | १३४५०.०० |
| **अकृषिक सारा आकारणीचे प्रयोजन** | **निवासी** |

३. प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र क्र. मुळशी/एनए/एसआर/२८/२०१८, दिनांक-२३/०४/२०१८ अन्वये अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन **(नव्याने समाविष्ठ)** | **निवासी** |
| २ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (चौ.मी.) | **१३४५०.००** |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.१० |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | १३४५.०० |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | ६७२५.०० |
| ६ | जिल्हा परिषद कर | ९४१५.०० |
| ७ | ग्रामपंचायत कर | १३४५.०० |
| | **वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये** | **१८८३०.००** |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन **क्र. एम.एच. ००० ८२३३०० २०१८१९ ई, दिनांक-२३/०४/२०१८** या कार्यालयास सादर केले आहे.

५. तसेच विषयांकीत मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास या कार्यालयाकडील अहवाल पाठविणेपुर्वीच महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील **पत्र जा. क्र. बीएमयु/ मौ. हिंजवडी/स.नं. १३७/१/१ब व इतर/प्र.क्र.१७१९/१५-१६, दिनांक-२७/०९/२०१८** अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे विषयांकीत नमुद मिळकत **अकृषिक झालेबाबतची योग्य ती नोंद** नमुद मिळकतीचे **७/१२** सदरी घेण्याकामी फेरफार घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास तसेच त्यानुसार **गाव नमुना नं. २** अद्यावत करून दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदारास उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित गांव कामगार तलाठी **हिंजवडी** यांना आपले स्तरावर कळविण्यात यावे. तसेच विषयांकीत मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे **७/१२** सदरी व **गाव नमुना नं. २** ला घेणेची कार्यवाही संबंधित गाव कामगार तलाठी यांचे स्तरावरून झाली किंवा कसे? याची पडताळणी आपले स्तरावरुन करणेत येऊन तद्नंतर प्रस्तुतची नोंद **तालुका नमुना नं. २** ला घेणेकामी योग्य ती कार्यवाही करावी. आपले कार्यालयाचे अभिलेखात जतन करणेकामी सोबत मुळ संचिका पान क्र. **१ ते ३७** जोडली असे.

**मा. जिल्हाधिकारी सो.**
**यांचे मान्यतेने**

सही/-xxx
**(प्रल्हाद हिरामणी)**
**तहसिलदार महसुल**

प्रत:-१)**मे. रोहन हौसिंग प्रा.लि. तर्फे श्री. संजय खुशालचंद लुंकड,** रा. १, मोदीबाग, सिटीएस नं. २२५४ ते २२६०, भांबुर्डा, गणेशखिंड, पुणे

२) **महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,** पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

**३) गाव कामगार तलाठी मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे**

४) **राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र** जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**(प्रल्हाद हिरामणी)**
**तहसिलदार महसुल**